सकाळ

# कमला कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

**टेंबलाईवाडी :** कमला महाविद्यालयात क्रांतिवीर रंगरावदादा पाटील ग्रंथालयामार्फत वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त कार्यक्रम झाला. क्रांतिवीर रंगरावदादा पाटील ग्रंथालय आणि बेस्ट बुक्स सेलरतर्फे ग्रंथ प्रदर्शन भरविले. कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर म्हणाल्या, "वाचनाने व्यक्तिमत्त्वात बदल घडतो. विद्यार्थीदशेत वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करणे महत्त्वाचे आहे." ग्रंथपाल ऊर्मिला कदम, प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी, प्रा. डॉ. अनिल घस्ते, प्रा. डॉ. सुजय पाटील, प्रा. डॉ. निता धुमाळ, प्रा. रेखा पंडित उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
11/03/2022 Page No. 4